डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/२६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in


जा.क्र/बार्टी-पुणे/BANRF- अधिछात्रवृत्ती/२०२४-२५/ ४४९५ दिनांक ९/०९/२०२४

## परिपत्रक

### विषय: डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण (बार्टी), पुणे मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती -२०२२ च्या प्रक्रीयेकरीता मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची पडताळणी करण्याकरीता उपस्थित राहणेबाबत.

उपरोक्त विषयांन्वये आपणास कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती -२०२२ करिता अर्ज केलेल्या उमेदवारांनी आपल्या मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता खालील नमूद दिनांकास उपस्थित राहणे आवश्यक आहे.

१) दि. १२/०९/२०२४ ते दि.२७/०९/२०२४ या कालावधीत (शासकीय सुट्ट्या वगळून) मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे घेऊन उपस्थित रहावे, सदर कागदपत्रांची तपासणी खालीलप्रमाणे दिलेल्या नियोजित अनुसूचीप्रमाणे करण्यात येणार आहे.

| अनु.क्र | दिनांक | तपासणी करीता उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी | तपासणी टेबल क्रमांक | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | १२/०९/२०२४ | यादी क्रमांक १ अनु क्र. ०१-७५ | अनु. क्र. १ ते ३३ टेबल क्रमांक १ | एकूण विद्यार्थी ७५ |
| | | | अनु. क्र. ३४ ते ७५ टेबल क्रमांक २ | |
| २ | १३/०९/२०२४ | यादी क्रमांक २ अनु क्र. ७६-१५० | अनु. क्र. ७६ ते ११२ टेबल क्रमांक १ | एकूण विद्यार्थी ७५ |
| | | | अनु. क्र. ११३ ते १५० टेबल क्रमांक २ | |
| ३ | १८/०९/२०२४ | यादी क्रमांक ३ अनु क्र. १५१-२२५ | अनु. क्र. १५१ ते १८७ टेबल क्रमांक १ | एकूण विद्यार्थी ७५ |
| | | | अनु. क्र. १८८ ते २२५ टेबल क्रमांक २ | |
| ४ | १९/०९/२०२४ | यादी क्रमांक ४ अनु क्र. २२६- ३०० | अनु. क्र. २२६ ते २६२ टेबल क्रमांक १ | एकूण विद्यार्थी ७५ |
| | | | अनु. क्र. २६३ ते ३०० टेबल क्रमांक २ | |
| ५ | २०/०९/२०२४ | यादी क्रमांक ५ अनु क्र. ३०१-३७५ | अनु. क्र. ३०१ ते ३३७ टेबल क्रमांक १ | एकूण विद्यार्थी ७५ |
| | | | अनु. क्र. ३३८ ते ३७५ टेबल क्रमांक २ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | २३/०९/२०२४ | यादी क्रमांक अनु क्र. ३७६- ४५० | अनु. क्र. ३७६ते ४१२ टेबल क्रमांक १<br>अनु. क्र. ४१३ ते ४५० टेबल क्रमांक २ | एकूण विद्यार्थी ७५ |
| ७ | २४/०९/२०२४ | यादी क्रमांक अनु क्र. ४५१- ५२५ | अनु. क्र. ४५१ ते ४८७ टेबल क्रमांक १<br>अनु. क्र. ४८८ ते ५२५ टेबल क्रमांक २ | एकूण विद्यार्थी ७५ |
| ८ | २५/०९/२०२४ | यादी क्रमांक अनु क्र. ५२६- ६०० | अनु. क्र. ५२६ ते ५६२ टेबल क्रमांक १<br>अनु. क्र. ५६३ ते ६०० टेबल क्रमांक २ | एकूण विद्यार्थी ७५ |
| ९ | २६/०९/२०२४ | यादी क्रमांक अनु क्र. ६०१- ६७५ | अनु. क्र. ६०१ ते ६३७ टेबल क्रमांक १<br>अनु. क्र. ६३८ ते ६७५ टेबल क्रमांक २ | एकूण विद्यार्थी ७५ |
| १० | २७/०९/२०२४ | यादी क्रमांक अनु क्र. ६७६- ७६३ | अनु. क्र. ६७६ ते ७१२ टेबल क्रमांक १<br>अनु. क्र. ७१३ ते ७६३ टेबल क्रमांक २ | एकूण विद्यार्थी ८८ |
| ***टीप: ज्या विद्यार्थ्यांचे कागदपत्र पडताळणी दरम्यान अपूर्ण कागदपत्र सादर केले असतील त्यांनी पुढील सात दिवसामध्ये सदर कागदपत्र बार्टी कार्यालयात सादर करावेत** | | | | |

२) BANRF-२०२२ अंतर्गत अर्ज केलेल्या उमेदवारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, “(बार्टी) पुणे जुने सर्किट हाऊस, २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे-४११००१ या पत्यावर सकाळी ठीक १०.३० वाजेपासून ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यत दिलेल्या दिनांकाप्रमाणे प्रत्यक्ष मूळ प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित राहणे आवश्यक आहे.

३) ज्या मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रांची पडताळणी करावयाची आहे त्या कागदपत्रांची यादी सोबत जोडण्यात आलेली आहे तसेच अर्जाची प्रत सोबत आणावी.

४) अर्जाची प्रत व मूळ कागदपत्रांच्या झेरॉक्स स्वयं साक्षांकित करून सादर करावी, केवळ प्रतिज्ञापत्र मा. कार्यकारी दंडाधिकारी यांच्या कोर्टातून Affidavit करून मूळ प्रतीत सोबत सादर करावे. तसेच सोबत देण्यात आलेल्या Cover Page (Annexure- II see attachment) व प्रपत्र ब (see attachment) डाऊनलोडकरून मूळ प्रतीत सादर करावे.

५) ज्या क्रमाने यादीतील प्रमाणपत्रे /कागदपत्रे मागविली आहेत, त्याच क्रमाने मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे पडताळनी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दाखवावीत, जेणेकरून वेळेत कार्यवाही पूर्ण करता येईल.

६) मूळ कागदपत्र पडताळणी करीता बार्टी, पुणे कार्यालय येथे पोहचल्या नंतर प्रथम आपण आपली नोंद करून घ्यावी नोंदणी केलेल्या क्रमाने कार्यवाही करण्यात येईल.

७) कागदपत्रांची पडताळणी करतांना अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याशी कोणताही वाद घालू नये, कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा शंका असल्यास मा. विभाग प्रमुख किंवा प्रकल्प व्यवस्थापक यांच्याशी भेटून आपली शंका किंवा समस्या दूर करावी.

८) आपल्या अर्जात कोणत्याही प्रकारची दुरुस्ती असेल तर आपण ती मूळ कागदपत्रांची तपासणी करताना संबंधित अधिकारी – कर्मचारी यांना सदर बाब निदर्शनास आणून द्यावी व दुरुस्ती करून घ्यावी.

९) कोणतेही मूळ कागदपत्र जमा करून नये, उमेदवारांनी आपल्या मूळ कागदपत्रांची काळजी स्वत: घ्यावी, कागदपत्रे गहाळ झाल्यास बार्टी कार्यालय यांस जबाबदार राहणार नाही.

१०) ज्या महिला उमेदवार गर्भवती असतील, अशा महिला उमेदवारांनी **bartifellowship2023@gmail.com** या इमेल-आयडी वर अनुउपस्थितीचा अर्ज डॉक्टरांच्या आवश्यक प्रमाणपत्रासह सादर करावा, अश्या उमेदवार आपल्या पालक किंवा प्रतिनिधीमार्फत कागदपत्रे पाठवून पडताळणी करून घेण्यास हरकत नाही

११) कागदपत्र पडताळणी करीता कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च/भत्ता या कार्यालयाकडून देण्यात येणार नाही

१२) **मूळ कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित नसणाऱ्या किंवा आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या उमेदवारांचा अर्ज रद्द करण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

१३) मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची पडताळणी झाल्यावरच विहित नियमानुसार पात्रता व अपात्रता ठरविण्यात येईल आपल्या काही शंका असल्यास बार्टी, पुणे संस्थेच्या दूरध्वनीवर संपर्क करावा.

-स्वा-
महासंचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था
(बार्टी), २८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११००१.

प्रतिलिपी:
डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF-२०२२) चे कागदपत्र पडताळणी करीता पात्र उमेदवार

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती
## (BANRF-२०२२)
## घोषणा

**कागदपत्रे पडताळणी प्रक्रियाबाबत सदर सूचना कृपया व्यवस्थित वाचाव्यात.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF-२०२२) करिता ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जातील माहितीच्या व बार्टी कार्यालयात सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे आपणास अधिछात्रवृत्ती करिता कागदपत्रे पडताळणी (Document Verification) करिता संशोधन विद्यार्थी यांना बोलविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांसह (Original Documents) उमेदवारांनी आपल्या अनुक्रमांक सूची व दिनांकानुसार बार्टी, कार्यालय, पुणे येथे उपस्थित राहावे.

**संशोधक अर्जदार विद्यार्थी यांनी पुढीलप्रमाणे सर्व कागदपत्राांची मूळ प्रत सादर करणे आवश्यक आहे. अर्जदाराने ऑनलाईन पदधतीने केलेल्या अर्जात, या कार्यालयास पाठविलेल्या कागदपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास तसेच आवश्यक प्रमाणपत्रांची / कागदपत्रांची पुर्तता न केल्यास (BANRF-२०२२) च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार मूळ कागदपत्रे तपासणे (Original Document Verification) करताना / प्रमाणपत्र तपासताना किंवा अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**मुळ कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया करिता सुचना व कागदपत्रे**

**अर्जदारांनी खालील सर्व नमुद कागदपत्रांच्या मुळप्रती व त्यांच्या स्व:साक्षांकित प्रतीचा (Self Attested) १ झेरॉक्स संच सोबत घेऊन यावे.**

| अ.क्र. | सादर करावयाची मूळ कागदपत्रे (ऑनलाईन अर्जानुसार) |
|---|---|
| १. | Cover Page (Annexure -II See Attachment) |
| २. | प्रपत्र ब (See Attachment) |
| ३. | बार्टीमध्ये नोंदणी केलेल्या ONLINE अर्जाची प्रत |
| ४. | प्रतिज्ञापत्र मा. दंडाधिकारी यांच्या कोर्टात Affidavit करुन मुळ प्रतीत सादर करावे. |
| ५. | उमेदवाराचे आधार कार्ड |
| ६. | Pan Card |
| ७. | उमेदवाराचा अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) |
| ८. | उमेदवाराचा जातीचा दाखला |
| ९. | उत्पन्नाचा दाखला |
| १०. | उमेदवाराचे 10 वी उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| ११. | उमेदवाराचे 12 वी उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| १२. | उमेदवाराचे पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| १३. | उमेदवाराचे पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| १४. | उमेदवाराचे NET/SET/PET परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र |
| १५. | उमेदवाराने पीएचडी करिता प्रवेश घेतल्याची पावती /पत्र |
| १६. | उमेदवाराचे पीएचडीकरिता नोंदणी पक्को झाल्याचे प्रमाणपत्र (Confirmation letter) |
| १७. | RAC/RRC ने मान्यता दिलेला संशोधन सारांश (Synopsis) |
| १८. | संशोधन केंद्रात संशोधनासाठी रुजू झाल्याचे पत्र |

| | |
|---|---|
| १९. | दिव्यांग प्रमाणपत्र (असल्यास) |
| २०. | नावात बदल असल्यास त्याचा पुरावा (Change in Name - Gazzette) |
| २१. | B+ मानांकन प्राप्त शासकीय विद्यापीठ/A मानांकन प्राप्त खाजगी विद्यापीठामध्ये प्रवेश घेतल्याबाबतचा पुरावा. (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचा दिनांक ३०/१०/२०२३ च्या शासन निर्णयानुसार) ज्या विद्यापीठात प्रवेश घेतला आहे त्याचे NAAC प्रमाणपत्र अथवा असे कागदपत्र की, ज्यावरुन विद्यापीठाला NAAC चे मानांकन असल्याचे दिसून येते. |

पुन्हा एकदा निदर्शनास आणण्यास येते की, आपली मूळ कागदपत्र पडताळणी प्रक्रिया करण्यात येणार असून उपरोक्त सूचना व्यवस्थितपणे वाचाव्यात व मूळ सर्व कागदपत्रासह पडताळणी करिता नेमून दिलेल्या दिवशी व विहित वेळेतच उपस्थित राहावे.

**Venue of the Document Verification: -**

Dr. Babasaheb Ambedkar Research
and Training Institute (BARTI),
28, Queens Garden, Near Old Circuit House,
Pune - 411001